# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 18/07/2023 (मंगळवार) दुपार

---

## चोरी

**पो.स्टे. कोंढाळी** :– अंतर्गत ५०० मी. अंतरावरील ईंडीयन पेट्रोलपंप स्टेट बॅके समोर फिर्यादी नामे– विनोद बालकिशनजी मुंदडा, वय ५८ वर्ष, रा. बाजारचौक कोंढाळी यांचे स्वत:चे मालकिचे पेट्रोलपंप असुन पेट्रोलपंपचे मागील बाजुस असलेल्या इलेक्ट्रीक पॅनलचे दोन वर्ष जुन्या सुहीतो कंपनीच्या ०५ बॅटऱ्या अंदाजे किंमती १०,८००/– रू. व पावर झोन कंपनीच्या ०२ बॅटऱ्या अंदाजे किंमती २३,६००/–रू. च्या बॅटऱ्या ठेवलेल्या होत्या तसेच पेट्रोलपंप वरील नालीवरच्या लोखंडी जाळया किंमती ६००/– रू. असा एकुण ३५,०००/–रूपयाचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कोंढाळी येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार भोजराज तांदुळकर ब. नं ५०६ पोस्टे कोंढाळी मो. नं. ९९२२३१४४४२ हे करीत आहे.

## मुरूम चोरी करणाऱ्या आरोपीविरूद्ध कारवाई

**पो.स्टे. कुही** :– अंतर्गत २६ कि.मी. अंतरावर मौजा हळगाव फाटा येथे दिनांक १७/०७/२०२३ चे ०२.३० वा. दरम्यान पोलीस स्टेशन कुही येथील स्टाफ यांना गुप्त बातमीदारांकडुन माहीती मिळाली की, मौजा हळगाव फाटा येथे अवैधरित्या टिप्परच्या साहाय्याने मुरूमची चोरी होत आहे. अशा मिळालेल्या गुप्त बातमीवरून पोलीस स्टेशन कुही येथील स्टाफने घटनास्थळी जावुन **आरोपी चालक नामे– राजु कृष्णाजी केवट, वय ३२ वर्ष, रा. उंद्री, ता. उमरेड** हा त्याचे ताब्यातील वाहन टिप्पर क्र. एम. एच. ४९/बी. झेड.– १७५५ किंमती अंदाजे २०,००,०००/– रू. मध्ये ०५ ब्रास गौण खनिज मुरूम किंमती अंदाजे ६००/– रू. ब्रास प्रमाणे ३०००/–रू. मुद्देमाल विना रॉयल्टी वाहतुक करून चोरी करून नेतांना मिळुन आल्याने आरोपीच्या ताब्यातून असा एकुण वाहनासह २००३०००/– रूपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणी कुही पोलीसांनी, पो.स्टे. कुही येथे आरोपीविरूद्ध कलम ३७९, १०९ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला असुन गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार ब. नं. ४८५ प्रमोद बन्सोड, मो. नं. ९६७३६०८६४२ हे करीत आहे.

# मोबाईल चोरी

**पो.स्टे. काटोल** :— अंतर्गत कुनबीपुरा वार्ड नं. १२ काटोल येथे दिनांक १७/०७/२०२३ चे १०/३० वा. ते १०/४० वा. दरम्यान फिर्यादी नामे— प्रकाश विठ्ठलराव वंजारी, वय ५८ वर्ष रा. कुणबीपुरा वार्ड नं. १२ काटोल हे घरी हजर असता फिर्यादीने त्यांचा Galaxy A22 सॅमसंग कंपनीचा मोबाईल समोरील हॉलमध्ये ठेवुन फिर्यादी आंघोळीला बाथरूम मध्ये गेला व काही वेळाने आंघोळ करून हॉलमध्ये आला असता फिर्यादीला त्यांचा वापरता Galaxy A22 सॅमसंग कंपनीचा मोबाईल ज्यामध्ये एयरटेल कंपनीचे सिम असलेला मोबाईल पाहला असता दिसला नाही. मोबाईलचा घरात व आजुबाजुला शोध घेतला असता मिळुन आला नाही कोणीतरी अज्ञात चोराने फिर्यादीच्या राहते घराच्या खुल्या दारामधुन आत प्रवेश करून फिर्यादीचा मोबाईल किंमती अंदाजे ७०००/— रू. चोरून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. काटोल येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस नायक निलेश उईके पोलिस स्टेशन काटोल मो. नं. ९०७५१६२८९६ हे करीत आहे.

**पोलीस माहिति कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**